REGISTERED No. B. 34 34

# अर्थ

अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वर्गणीचे दर :

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ४ आ.

जाहिरातीचे दर :

करारास्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–

"अर्थ"

"दुर्गाधिवास" पुणें ४.

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ३० मार्च, १९४९ अंक १३

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठी चौकशी करा:—

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५११

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज्
(ले.:–जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)

(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
(ले.:–जे. बी. टेलर, किं. १ रु.)

(३) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट
(ले:–. रेवि ॲले, किं. २ रु.)

**सारस्वत**

**को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

[स्थापना १९१८]



टे. नं. ३१६७५

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | ... | रु. ४,१७,००० |
| रिझर्व्ह | ... | रु. २,५५,००० |
| ठेवी | ... | रु. ८५,००,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. ९१,००,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

— विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा —

सब–ऑफिस : —दादर— (बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर)

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें









## सर्व प्रसिद्ध माल

गरम झरे, आंबोळयाचे तवे, खलबत्ते, शेगड्या वगैरे घरांत लागणारे जिन्नस.

| | |
|---|---|
| केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक. |

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**पाकिस्तानमधील रेल्वेची मोहीम**—पश्चिम पाकिस्तानमधील रेल्वे कंपन्यांनीं गाड्यांतून प्रवास करणाऱ्या भिकाऱ्यांविरुद्ध जोराची मोहीम चालू केली आहे. त्याचप्रमाणें उतारूंनीं गाड्यांतून प्रवास करतांना स्वच्छता पाळावी म्हणून मुद्दाम प्रचार करण्यास प्रारंभ केला आहे.

**सामाजिक विम्याची योजना**—एंप्लॉयीज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशनचे डायरेक्टर जनरल डॉ. कतिआल आणि सरकारचे इन्शुरन्स कमिशनर डॉ. अल्बुकर्क हे सध्या दौऱ्यावर आहेत सामाजिक विम्याची योजना अंमलांत आणण्यासाठी त्यांचा हा दौरा चालू आहे. प्रथम मध्यवर्ती सरकारच्या हुकमतीखालील दिल्ली आणि अजमीर-मारवाड ह्या प्रांतांतून एक सामाजिक विम्याची योजना प्रयोगादाखल अंमलांत आणण्यांत येणार आहे. ह्या योजनेंत कारखान्यांत काम करणाऱ्या व मासिक ४०० रुपयांपेक्षा कमी पगार मिळविणाऱ्या नोकरांचा समावेश करण्यांत येणार आहे. विमासंरक्षित नोकरांना वैद्यकीय मदत देण्यांत येईल आणि त्यांच्या आरोग्यासंबंधीं सर्व प्रकारच्या नोंदी ठेवण्यांत येतील. ह्या प्रयोगाचा अनुभव लक्षांत घेऊन सर्व देशाकरतां एक तपशीलवार योजना तयार करण्यांत येईल.

**चिनी स्त्री-शास्त्रज्ञाबद्दल अमेरिकेची आस्था**—युंग-काय लुइ नांवाची एक चिनी शास्त्रज्ञ अमेरिकेंत १९३६ सालापासून कार्य करीत आहे. गेल्या युद्धांत ह्या बाईनीं अणुबाँबच्या कारखान्यांत काम केलेलें आहे. त्यामुळें ह्या बाबतींत तिला असलेली माहिती अमेरिकेशीं शत्रुत्व असलेल्या राष्ट्रांना मिळूं नये अशी अमेरिकेची इच्छा आहे. अमेरिकन कॉंग्रेस एक कायदा मंजूर करून बाईची अमेरिकेंतच कायमची रहाण्याची तरतूद करीत आहे. चीनमधील घडामोडी लक्षांत घेता, बाईच्या जवळची माहिती चीनला आणि त्याच्यातर्फे रशिआला मिळूं नये, असा हा प्रयत्न असावा.

**सक्करच्या धरणाला भेगा**—१९३२ सालीं १६ कोट रुपये खर्च करून बांधलेल्या सिंधमधील सक्करच्या धरणाला कांहीं ठिकाणीं भेगा पडल्याचें समजतें. सिंध प्रांताची भरभराट ह्या धरणामुळेंच झाली. सिंध सरकार पाकिस्तान सरकारच्या तज्ज्ञ एंजिनिअरांचा सल्ला घेत आहे. परंतु त्याशिवाय स्वीडनमधील एका धरण विषयक तज्ज्ञाचा आणि मुंबईतील एका प्रख्यात एंजिनिअरचाहि सल्ला घेण्यांत येणार आहे.

**दारूसंबंधीं जाहिराती**—दारूच्या आणि इतर मादक पदार्थांच्या जाहिराती मध्यवर्ती सरकारच्या प्रकाशनांतून छापण्यांत येऊं नयेत, असा निर्णय सरकारनें घेतल्याचें समजतें. ह्यासंबंधीं हिंद सरकारच्या वेगवेगळ्या खात्यांचीं मतें घेण्यांत आलीं असतां तीं वरील निर्णयाला अनुकूल पडलीं.

**साखरेवरील निर्यात जकात**—मुंबई सरकारनें दर रुपयामागें ३ पै ह्याप्रमाणें साखरेवरील निर्यात-जकात घेण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें प्रांतांतील साखरेच्या धंद्यावर वाईट परिणाम होईल असें मत बाँबे शुगर मर्चंटस असोसिएशनच्या अध्यक्षांनीं व्यक्त केलें आहे. मुंबई प्रांतांत दरवर्षी ३,५०,००० टन साखर खपते; ह्या गोष्टीचा विचार करतां सरकारचें धोरण योग्य नाहीं असें तिचें म्हणणें आहे. साखरेच्या धंद्यांतील कांहीं अनिष्ट प्रथांचा उल्लेख करतांना अध्यक्षांनीं अशी माहिती सांगितली कीं, कांहीं साखरेचे कारखाने चढत्या भावानें साखर विकून बिलें मात्र कमी किंमतीचीं देतात; अशा रीतीनें त्यांनीं कर्मांत कमी ५० लाख रुपये मिळवले आहेत, असा अध्यक्षांचा अंदाज आहे.

**हिंदमधील कापसाची निर्यात**—हिंदमध्यें सध्या कापसाची टंचाई भासूं लागली आहे. ही परिस्थिति लक्षांत घेऊन हिंद सरकारनें डॉलरसारखें दुर्मीळ परदेशीय चलन देणारे देश सोडून इतर देशांना कापूस निर्यात करण्यास परवाना देण्याचें नाकारलें आहे. कांहीं परकीय राष्ट्रें हिंदुस्थानकडून कापूस घेऊन तो पुन्हां अमेरिकेला निर्यात करीत आहेत. त्यामुळेंहि हिंदुस्थानची डॉलर्स मिळण्याची अडचण अधिक वाढते, असें दिसून आलें आहे.

**शेतीच्या यंत्रसामुग्रीची आयात**— १९४८ सालीं हिंदुस्थानांत आयात झालेल्या शेतीच्या यंत्रसामुग्रीचा तपशील पुढें दिल्याप्रमाणें आहे. यांत्रिक नांगर आणि त्याचे भाग, किंमत १८३·८ लाख रुपये; इतर यंत्रसाहित्य, किंमत २१·८ लाख रुपये.

**कापसाच्या किंमतीवर नियंत्रण राहणार**— सध्या कापसाच्या पुरवठ्यावर आणि किंमतीवर जीं नियंत्रणें आहेत तीं रद्द करण्याचा हिंदुस्थान सरकारचा मुळींच विचार नाहीं, असें सरकारचे कापूस नियंत्रणाधिकारी श्री. दलाल ह्यांनीं नुकतेंच जाहीर केलें. रायचूर येथील कापसाचे उत्पादक आणि व्यापारी ह्यांच्याशीं वरील चर्चा करतांना त्यांनीं असेंही सांगितलें कीं उत्पादकांनीं आणि व्यापाऱ्यांनीं आपला कापूस हातांशीं येईल तसतसा विकावा हें चांगलें. नियंत्रण उठेल अगर किंमतींत वाढावा होईल ह्या आशेवर त्यांनीं कापसाचा सांठा करूं नये.

**मुंबई प्रांतांतील औद्योगिक तंटे**— १९४९ सालीं मुंबई प्रांतांत ५३६ औद्योगिक तंटे उपस्थित झाले. ह्या तंट्यांशीं ३,८४,३८५ कामगारांचा संबंध आला आणि १८,१०,७९३ कामाचे दिवस वाया गेले. १९४७ सालीं औद्योगिक तंट्यांची संख्या ६५० होती, संबंधित कामगार ७,२६,५९४ होते आणि वाया गेलेल्या दिवसांची संख्या २७,८३,८१७ होती. १ ऑक्टोबर १९४८ अखेर कामगारांच्या ७१४ संघटना होत्या. ह्या संघटनांतून मिळून ५,६९,५९९ कामगार सभासद होते. १९४७ सालीं हे आंकडे अनुक्रमें ५७० आणि ४,६८,०७८ असे होते. १९४७ सालीं औद्योगिक कोर्टानें १३४ तंट्यांचा निकाल दिला होता; १९४८ सालीं कोर्टानें १७६ खटले निकालांत काढले.

**हिंदी पोस्ट खात्याचा व्याप**—१९४८-४९ सालीं हिंदमधील पोस्ट ऑफिसांनीं २१५·२ कोटी वस्तूंचा बटवडा केला, १४३ कोटी रुपयांच्या मनिऑर्डरींचा व्यवहार केला, वर्षांत पाठविलेल्या तारांची संख्या २,३३,७०,००० इतकी भरली. ग्रामीण भागांतून १,७०३ नवीं पोस्ट ऑफिसें उघडण्यांत आलीं. २,००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक खेड्यांतून पोस्टऑफिसें उघडण्याचे प्रयत्न खात्यातर्फे चालू आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. ३० मार्च १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## १९५१ नंतर धान्याची आयात थांबविण्याचा निश्चय

हिंद सरकारचे अन्नमंत्री श्री. जयरामदास दौलतराम ह्यांनीं देश अन्नधान्याच्या दृष्टीनें स्वावलंबी करण्याची एक योजना नुकतीच जाहीर केली. ह्या योजनेंत पुढील सात मुद्यांवर भर देण्यांत आला आहे: (१) कांहीं कारणानें देशांतील पीक मोठ्या प्रमाणावर बुडालें तर आणि सरकारजवळ धान्याचा सांठा करण्यासाठीच १९५१ नंतर परदेशांतून धान्य आयात करण्यांत येईल. (२) आयातीसंबंधींचें हें धोरण लक्षांत घेऊन प्रांत आणि संस्थानें ह्यांनीं आपले अन्नधान्याचे कार्यक्रम आखावयाचे आहेत आणि अन्नधान्याची वसुली अधिक जारीनें करावयाची आहे. (३) ज्यां जमिनींत अन्नधान्यें उत्पन्न होतात अशांना जर पाण्याच्या पुरवठ्याची शाश्वति असेल-तर त्यांची लागवड अधिक कसून करणें. (४) १९५१ पर्यंत ८ लाख एकर पडीक जमीन यांत्रिक नांगरांच्या साह्यानें लागवडीखालीं आणणें. (५) बोअरिंगच्या विहिरी खोदणें. (६) भाताच्या पाटबंधाऱ्याखालील जमिनीसाठी अधिक प्रमाणांत खताची आयात करणें. (७) जीं पिकें देशाच्या गरजेच्या मानानें अधिक असतील त्यांच्याखालील जमीन अन्नधान्याच्या लागवडीखालीं आणणें.

ह्या कार्यक्रमाची अंमलबजावणी त्वरित करण्यासाठी मध्यवर्ती सरकार एक बोर्ड स्थापन करणार आहे आणि त्याच्याच धर्तीवर प्रांतांनीं आपआपलीं बोर्डें स्थापन करावयाचीं आहेत. हिंद सरकारनें आंखलेली ही नवी योजना अर्थशास्त्रज्ञांच्या एका कमिटीनें, संबंधित खात्यांच्या तज्ज्ञांनीं आणि प्रांतांच्या प्रतिनिधींनीं डोळ्याखालून घातलेली आहे. परदेशांतून अन्नधान्याची नेहमी आयात करणें ही गोष्ट परकीय चलनाच्या–विशेषतः डॉलर्सच्या–तुटवड्यामुळें दिवसेंदिवस अशक्य होत चालली होती. अर्थातच हिंदनें आपलें अन्नधान्याचें उत्पादन निदान आपल्या किमान गरजा भागविण्याइतकें वाढविणें हा एकच उपाय अन्नधान्याचा प्रश्न कायमचा सोडविण्याच्या दृष्टीनें योग्य आहे. म्हणून मध्यवर्ती सरकारनें आंखलेली ही योजना स्वागतार्ह आहे हें सांगणें नकोच. पण खरा प्रश्न योजना आखण्याचा नसून ती अंमलांत आणण्याचा आहे. कागदी योजना फक्त कागदावरच रहातात; प्रत्यक्ष फलाच्या दृष्टीनें त्यांचा उपयोग फारसा होत नाहीं असा अनुभव अनेकदां आला आहे. ह्या आपत्तीला तोंड देण्याचें काम जितकें सरकारचें आहे, तितकेंच किंबहुना त्याहूनही अधिक तें जनतेचें आहे. सार्वजनिक कार्यकर्त्यांनीं हिंदची अन्नधान्याची परिस्थिति खेडोपाडीं हिंडून स्पष्ट करून सांगितली पाहिजे; आणि सरकारची योजना पार पाडण्यांत अखेर जनतेचेंच हित कसें आहे हें पटवून दिलें पाहिजे. योजना पार पाडण्यांत जनतेच्या उत्साहाला आणि कार्यक्षमतेला आवाहन दिलें गेलें नाहीं तर हीच काय पण कोणतीही निर्दोष योजना बारगळल्याशिवाय रहाणार नाहीं. अन्नमंत्र्यांनीं सुचविलेल्या योजनेंत नवीन असें कांहीं नाहीं. हिंदुस्थानांत अन्नधान्याचें दर एकरीं पीक इतर पुढारलेल्या देशांच्या मानानें अगदीं अल्प आहे. ह्या गोष्टीला इतर कारणांबरोबर पाण्याचा हुकमी पुरवठा नसणें हें कारण असूं शकेल. म्हणूनच ज्या जमिनींना पाण्याचा पुरवठा निश्चित होईल अशी सोय असेल त्या जमिनींतून आधुनिक पद्धतीनें अधिकांत अधिक पीक काढलें गेलें पाहिजे. अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेंत आजवर विशेष भर नवीन जमीन मामुली पद्धतीनें लागवडीस आणण्यावर दिला गेला होता. त्याऐवजीं जास्तींत जास्त पीक काढण्याचें धोरण अधिक फलदायी होण्याची शक्यता आहे.

मध्यवर्ती सरकार ६० लाख एकर पडीक जमीन नव्यानें लागवडीखालीं आणणार आहे. त्यापैकीं १९५१ अखेर ८ लाख एकर जमीन नांगरली जाणार आहे. अलीकडे सहकारी शेतीला अनेक कारणांनीं महत्त्व येऊ लागलें आहे. जमीन आणि तिची मशागत करणारा शेतकरी ह्यांची सांगड सहकारी पद्धतीवर सरकारला घालतां येण्यासारखी आहे. हिंदुस्थानांत शेत-मजुरांचा फार मोठा वर्ग गेल्या कांहीं वर्षांत निर्माण झालेला आहे. हा वर्ग पुष्कळदां आपआपल्या गांवींच निकृष्ट [illegible] जमतांना आढळतो. नवीन लागवडीखालीं आणावयाच्या जमिनींत बी-बियाणाबरोबरच ह्या वर्गाचीही पेरणी करण्यास हरकत असूं नये. ह्या वर्गाला उत्पादनक्षम करण्यासाठीं योग्य तीं प्रलोभनें अर्थातच निर्माण करण्यांत आलीं पाहिजेत. अन्नधान्याची कमतरता भरून काढण्यासाठीं केळीं, रताळीं, पपया ह्यांची लागवड वाढविण्याचा सरकारचा विचारही इष्ट आहे. हिंदुस्थानांतील अन्नधान्याच्या उत्पादनाची कांहीं तौलनिक माहिती खालील तक्त्यांत दिली आहे.

**अन्नधान्याच्या लागवडीखालीं असलेली जमीन**
**( आकडे हजार एकरांचे )**

| | १९४६-४७ | १९४७-४८ | वाढ (+) अथवा घट (–) |
|---|---|---|---|
| तांदूळ | ६०,९८७ | ५९,६५६ | (–) १,३३१ |
| गहू | २४,३४८ | २०,२०९ | (–) ४,१३९ |
| ज्वारी | ३७,८४४ | ३५,६६५ | (–) २,१७९ |
| बाजरी | २१,४४२ | १९,६२६ | (–) १,८१६ |
| मका | ७,८८८ | ७,७५५ | (–) १३३ |
| बार्ली | ७,०८२ | ७,१२७ | (+) ४५ |
| डाळ | १६,९७१ | १८,४९८ | (+) १५२७ |

**अन्नधान्याचें उत्पादन***
**( आकडे हजार टनांचे )**

| | १९४६-४७ | १९४७-४८ | वाढ (+) अगर घट (–) |
|---|---|---|---|
| तांदूळ | १९,८५६ | १८,७६० | (–) १,०९६ |
| गहू | ४,७४४ | ५,३४८ | (+) ६०४ |
| ज्वारी | ५,२७७ | ५,७३० | (+) ४५३ |
| बाजरी | २६६७ | २५२५ | (–) १४२ |
| मका | २,०३५ | २,१११ | (+) ७६ |
| बार्ली | २,४१४ | २,४८८ | (+) ७४ |
| डाळ | ३,५९९ | ४,३१० | (+) ७११ |

## सक्करचें धरण व त्याची नादुरुस्ती

सिंधू नदीवर सक्कर येथें मुंबई प्रांताच्या पब्लिक वर्क्स खात्यानें १९२३ ते १९३३ मध्यें नदीचें पाणी थोपवून धरून पांच कॅनालमध्यें तें सोडण्याची व्यवस्था करण्याकरितां एक जगप्रसिद्ध धरण बांधलें. १९३५ मध्यें सिंध प्रांत मुंबईपासून वेगळा झाला व तेव्हांपासून या धरणाची दुरुस्ती वगैरे सिंध सरकारच्या इंजिनिअरांचेकडे होती. हें धरण बांधण्याचे कामीं सक्कर येथें मुबलक मिळणारा चुनखडीचा दगड वापरण्यांत आला व बांधकामाचा चुनाही त्याच दगडाचा भाजून करण्यांत आला. या दगडापेक्षां अधिक भक्कम दगड सिंधमध्यें कोठेंच मिळत नाहीं व त्याचीं पुष्कळ बांधकामें वर्षानुवर्षें टिकलेलीं आहेत. पण हें दीर्घायुष्य पावसाचे अभावीं आहे. जेथें पाण्याचा संसर्ग येतो तेथें भाजलेल्या विटांचा उपयोग केला जातो. हा दगड इतका नरम असतो कीं तो ताजा असतांना पोलादी तारांच्या करवतींनीं कापला जातो. हवा लागल्यावर बराच टणकपणा त्यांत येतो. सक्कर येथें होणारा चुना शुद्ध असल्या कारणानें तो पाण्यांतील बांधकामास उपयोगी पडत नाहीं. म्हणून त्यांत भाजलेल्या विटांची पूड (सुरखी) मिसळण्यांत येते व तसा भाजलेला चुना, विटांची पूड व वाळू मिश्रित मळलेला चुना मजबूत व टिकाऊ होतो. मद्रास, म्हैसूर व उत्तर हिंदुस्थानांत असा चुना वापरण्याचा प्रघात आहे. या चुन्यास खर्च फार पडतो म्हणून त्याचा उपयोग जरूर तेथेंच सक्करच्या धरणांत करण्यांत आला असावा व या तत्त्वाप्रमाणें पाण्याच्या बाहेरील बांधकामांतल्या चुन्यांत विटांची पूड म्हणजे (सुरखी) वापरली गेली नाहीं. धरणांत जे दोष किंवा जो कमकुवतपणा अलिकडे दृष्टोत्पत्तीस आला आहे, तो या चुन्याच्या साधेपणामुळें आलेला दिसत नाहीं, तर दगडाच्या ठिसूळपणामुळेंच भानगड उपस्थित झालेली दिसते. हातीं पडलेल्या माहितीप्रमाणें कित्येक दगडांना भेगा पडलेल्या आहेत. त्या बांधकामांत नाहींत, त्याचा अर्थ, हवा, उष्णता व पाण्याचे तुषार या सर्वांचे आघातांमुळें दगड भंगत चाललेला आहे व त्याचें भंगणें कसें थांबवावें, याकडेच तज्ज्ञ लोकांचें लक्ष लागणार. सबंध बांधकाम खराब किंवा कमजोर झालेलें दिसत नाहीं व ताबडतोब जरूर व अवश्य ते इलाज केल्यास धरण बळकट करणें शक्य होईल.

आधुनिक साधनें उपलब्ध असल्यामुळें धरणाची मजबुती पैसा खर्च केल्यास होणें असुलभ नाहीं. दर्शनी बांधकाम खराब झालें म्हणजे त्यावर मजबूत आच्छादन देण्याचा प्रघात जुनाच आहे व तीच तोड बहुतेक सुचविली जाईल. तसें केलें म्हणजे धरणाच्या बांधकामांतून पाण्याची आरपार गळतीही बंद होईल. पोलादी खुंट्या बांधकामांत मारून त्यावर बळकट पोलादी जाळी बांधावी व त्यावर सिमेंट व वाळूचा गिलावा केल्यास मजबुती येईल. हा गिलावा हवेच्या दाबानें करावा म्हणजे त्यांत हवा न रहातां तो अतिशय बळकट होतो. हें काम करतांना खांबाभोंवतीं पोलादी गजांचें वेष्टण केल्यास त्यांना अत्यंत बळकटी येईल व तोंडाचे दगड जरी फुटले तरी ते जागेवरून हलणार नाहींत. वरील वेष्टनानें हवा, उष्णता व पाणी यापासून बांधकामास संरक्षण मिळेल.

आमचे मतें सक्कर धरणाची आयुर्वृद्धि करणें खर्चाचें पण खात्रीनें करतां येण्याजोगें आहे. तज्ज्ञ व सल्लागार चांगले निवडले जाणें मात्र इष्ट आहे व ते तसें पाकिस्तान सरकार करील असा भरंवसा वाटतो.

## दि ओगले ग्लास वर्क्स लि., आगलेवाडी

( वार्षिक सभा : १० एप्रिल, १९४९ )

वरील कंपनीनें १९४८ सालीं २३ लक्ष, ६८ हजार रुपये किंमतीच्या मालाची विक्री करून ६ लक्ष, ९२ हजार रुपये ठोक नफा मिळविला. त्यांतून व्यवस्थेचा खर्च, घसारा, मॅनेजिंग एजंटांचें कमिशन, इत्यादि वजा जातां निव्वळ नफा १,६४,७३१ रु. राहिला. त्यांत मागील शिलकी नफा ( १,८५३ रु. ) व डि. ई. फंडांतून घेतलेली रक्कम ( ३०,००० रु. ) ही मिळवली म्हणजे नफावाटणीस १,९६,५८४ रु. आले. कराची तरतूद ( ३०,००० रु ), कामगारांना बोनस (७०,००० रु.), ६½% डिव्हिडंड ( ९४,००० रु. ) असा विनियोग सुचविण्यांत आला आहे. मॅनेजिंग एजंटांनीं आपल्या कमिशनपैकी १४,४३३ रु. कंपनीस परत केले आहेत. पक्क्या मालाच्या किंमतींत उतार होऊन कच्च्या मालाच्या किंमतीत वाढ होत राहिल्यामुळें नफ्याची कूस कमी राहिली. आतां कच्च्या मालाचा तुटवडा कमी झाला असल्यानें, कमी किंमतींत मोठें उत्पादन काढण्याचा चालकांचा प्रयत्न आहे. बाटल्यांच्या उत्पादनांत लवकरच मोठी भर पडून नफा वाढेल. म्हैसूर ग्लास अँन्ड एनॅमल वर्क्स लि. बंगलोरची मॅनेजिंग एजन्सी ओगले ग्लास वर्क्स लि. कडे होती. तिची मुदत गेल्या वर्षीं संपली. ती आणखी १० वर्षांनीं वाढविण्यांत आली आहे. कंपनीचा ताळेबंद ४२½ लक्ष रुपयांचा आहे. त्यापैकी भाग भांडवल व रिझर्व्ह आणि इतर फंड ह्यांत २१ लक्ष रुपये आहेत आणि ठेवींची रक्कम ५½ लक्ष रुपये आहे.

# NOTICE.

**THE BHARAT INDUSTRIAL BANK, Ltd., POONA**

Notice is hereby given that the 11th Ordinary General Meeting of the Shareholders of the Bharat Industrial Bank Ltd., Poona will be held on Sunday, the 10th April, 1949 at the Registered Office of the Bank, 15, Shukrawar Peth, Poona, at 4-30 P. M. to transact the following business.

1. To receive and consider the Report of the Directors, Audited Balance Sheet and Profit and Loss Account for the period ending 31st December 1948.

*2. To declare a dividend.

3. To elect Directors in places of the retiring Directors who are eligible for re-election.

4. To appoint Auditors and fix up their remuneration.

5. To transact such other business as may be allowed by the Chairman.

By order of the Board,

Poona, 24th March, 1949. N. N. Kshirsagar,
15, Shukrawar Peth, R. B. Salvekar,
Poona 2. Managing Directors.

*N. B.*—The Transfer Books of the Bank will be closed from 9th April to 16th April, 1949 both days inclusive.

* The dividend when sanctioned will be payable on and after 1st May, 1949. The dividend warrants will be posted to the registered addresses of the Share-holders.

## मक्कम पायावरील यशस्वी मूल्यमापनांची अखंड परंपरा

### वेस्टर्न इंडियाचें उत्कृष्ट यश

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कं. लि. चें ३१–१२–१९४७ अखेरचें १० वें मूल्यमापन कंपनीचे ॲक्चुअरी व मॅनेजर श्री. कृ. य. जोशी, बी. ए., एफ. आय. ए., ह्यांनीं केलें आहे.

मूल्यमापनासाठी, ओरिएंटल विमा कंपनीनें १९२५ ते १९३५ ह्या कालांतील मृत्युप्रमाणाच्या अनुभवावरून तयार केलेल्या कोष्टकांचा उपयोग केलेला आहे

व्याजाचा दर ३% गृहीत धरला आहे. पुढील मूल्यमापनास व्याजाचा दर ह्याहूनही कमी करण्याचे हेतूनें ७,५०,००० रुपयांचा स्वतंत्र निधि काढला आहे. तो लक्षांत घेतला, तर मूल्यमापनाचा दर फक्त २⅞% पडतो ! वास्तविक, १९४७ मध्यें कंपनीचे निधीवर ३·५९% व्याजाचा दर पडलेला आहे. प्रत्यक्ष खर्ची पडलेल्या रकमेपेक्षा बाजारभावानें कंपनीच्या जिंदगींत ८,४९,०३८ रु. ची वाढ आहे, परंतु ती हिशेबांत घेतलेली नाहीं.

मूल्यमापनाचे वेळीं कंपनीकडे ११,४४,११,६५५ रुपयांचे ८०,२७२ विमे चालू होते. मागील मूल्यमापनाचे वेळचे मानानें प्रत्येक विमा-पत्राच्या सरासरी रकमेंत इष्ट अशी वाढ झालेली आहे. विम्यांच्या हप्त्यांचें उत्पन्न १९४७ सालीं ६१,६२,१९४ रु. वर गेलें. विमानिधि ३,२५,३६,८३६ रु. झाला. पांच वर्षांच्या अवधींत हप्त्यांचें उत्पन्न दुपटीनें वाढून विमा–निधीहि जवळ जवळ दुप्पट झाला आहे

मूल्यमापन केल्यावर निव्वळ जोखीम ३,०२,८१,८२९ रु. निघाली व कंपनीला २३,५२,०५१ रु. निव्वळ वाढावा उरला. त्यापैकी ९५% म्हणजे २२,०२,५२९ रु. विमेदारांच्या वाटणीस आले. हयातीनंतरच्या व हयातींतील विम्यांना मूल्यमापनाचे ५ वर्षांचे दरसाल दरहजारीं अनुक्रमें १० रु. व ८ रु. देण्यास २१,४६,३७२ रु. लागतील व ५६,१५७ रु. विमेदारांच्या नफ्याचे निधींत शिल्लक रहातील. सर्वसाधारण गंगाजळी, क्लॉ. रिझर्व्ह फंड, क्लेम रिझर्व्ह, डिव्हिडंडचा दर स्थिर राखण्यासाठी गंगाजळी व विमेदारांच्या नफ्याचे तरतुदीची गंगाजळी, ह्या सर्व निधींची रक्कम ७,१४,२६२ रु. भरते.

मूल्यमापनाच्या वरील संक्षिप्त अहवालावरून, वेस्टर्न इंडियाच्या काटेकोर आदर्श धोरणाची कल्पना येईल. जरूरीपेक्षा नेहेमीच जास्त तरतूद आगाऊ करून ठेवून, कंपनीचा भक्कमपणा वाढविण्याचें डायरेक्टरांचें धोरण विमेदारांना व भागीदारांना हितावह ठरतें आणि त्यामुळें कंपनीचा उत्कर्ष अधिकाधिक होत जाऊन त्यांत पुनः विमेदार व भागीदार सहभागी होतात. वेस्टर्न इंडियाच्या आर्थिक सुस्थितीबद्दल व तिच्या चालकांच्या दूरदर्शीपणाबद्दल कंपनीचें अवश्य अभिनंदन केलें पाहिजे.

### म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि.

म्हैसूर ग्लास अँड एनॅमेल वर्क्स लि. ला १९४८ सालीं ८७७ रु. नफा झाला. डिव्हिडंड देण्यास अपुरा पडेल इतका कमी फायदा ह्या कंपनीला ह्यापूर्वी कधींहि झाला नव्हता. १९४७ चे मानानें १९४८ सालीं अधिक टनांचें उत्पादन होऊनहि त्याची विक्रीची किंमत मात्र कमी भरली (१९४७: ४३४ टन; ५,९९,००० रु. १९४८: ४८० टन; ५,४८,००० रु.) विदेशी स्वस्त मालाच्या आयातीचा हा परिणाम आहे.

### दि बँक ऑफ औंध, लि., औंध

( वार्षिक सभा : ?-४-४९ )

औंध संस्थान मुंबई प्रांतांत सामील झाल्यामुळें बँक ऑफ औंधच्या व्यवहारावर बराच परिणाम झालेला आहे. संस्थानाबरोबरचा व्यवहार बंद झाला; संस्थानच्या बँकेकडे असलेल्या सर्व ठेवी काढण्यांत आल्या; परंतु बँकेनें संस्थानाला दिलेलीं कर्जें वसूल होण्याचीं राहिलीं आहेत. संस्थानकडून बँकेला मोठ्या प्रमाणावर जो पाठिंबा मिळत होता, तो लक्षांत घेऊनच हीं कर्जें अगदी थोड्या व्याजानें दिलेलीं होतीं. सदर कर्जाचे बाबतींत मुंबई सरकाराबरोबर पत्रव्यवहार चालू असून हीं कर्जें लवकरच वसुलांत येतील, असें समजतें. औंध संस्थानांतील सहकारी सोसायट्यांचा व्यवहार लवकरच प्रांतांतील सहकारी बँकांकडे सोपवावा लागेल. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे बँकेच्या खेळत्या भांडवलांत व किफायतशीरपणांत झालेली घट, हा होय. बँकेच्या चालकांनीं ही सर्व वस्तुस्थिति स्पष्टपणें भागीदारांपुढें मांडली असून, पुढील वर्षी बरीच प्रगति दाखविण्याची आशा व्यक्त केली आहे. १९४६ सालींच बँकेनें सातारा येथें शाखा उघडून व गेल्या वर्षी तेथें मुख्य कचेरी नेऊन व्यवहार वाढविण्याचे कामीं दक्षतापूर्वक तयारी केली आहे. औंधप्रमाणें इतरहि विलीन संस्थानांतील कित्येक सहकारी व व्यापारी बँकांवर विलिनीकरणाचा कांहीं परिणाम झाला असणें स्वाभाविक आहे. औंध बँकेच्या १५½ लक्ष खेळत्या भांडवलापैकी २½ लक्ष रुपयांचें भांडवल तिचें स्वतःचें आहे आणि बँकेजवळ ४½ लक्ष रुपयांचे रोखे आहेत. अहवालाचे वर्षी, प्रारंभीं नमूद केलेल्या कारणांमुळें व ५ हजारांचीं संशयित कर्जें लिहून टाकल्यामुळें नफा वाटणीस पुरेसा नफा बँकेस झाला नाहीं, म्हणून डि. ई. फंडांतून जरूर ती रक्कम काढून ४% डिव्हिडंड द्यावें, अशी डायरेक्टर बोर्डानें शिफारस केली आहे. श्री. मा. रा. जोशी, पेपर मर्चंट, पुणें हे बँकेचे चेअरमन असून श्री. बा. रा. वर्तक हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

**अन्नधान्याचें उत्पादन वाढलें**—अन्नधान्याच्या लागवडीखालील जमीन आणि तिचें उत्पादन ह्यासंबंधी प्रांतिक व संस्थानी सरकारांकडून ताजी माहिती आली आहे. त्यावरून असें दिसतें कीं, १९४६-४७ ह्या वर्षांतील उत्पादनापेक्षा १९४७-४८ मधील प्रमुख अन्नधान्याचें उत्पादन सुमारें ६ लाख टनांनीं वाढलें आहे. उत्पादनांत झालेली ही वाढ मध्यप्रांत, मुंबई आणि संयुक्तप्रांत ह्या प्रांतांतून मुख्यतः झाली आहे.


कॉमनवेल्थ विमा कंपनी, लि., पुणें.

जीवित विमा एजन्सी | स्वतंत्र वृत्तीनें काम करणाऱ्या एजंटांना भरपूर मोबदला | आग विमा एजन्सी

★ खानदेश, नाशिक, नगर, सोलापूर, सातारा, पुणें, मुंबई व ठाणें ह्या जिल्ह्यांतून भरपूर कमिशन व सढळ अटींवर एजंट्स नेमणें आहेत.

त्वरित माहिती मागवा. श्री. म. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

## हिंदी कापडाच्या गिरण्या

| | ३१ ऑगस्ट अखेर संपणारें वर्ष | |
|---|---|---|
| | १९४७ | १९४८ |
| गिरण्यांची संख्या | ४२३ | ४२२ |
| वसूल भांडवल (कोटी रुपये) | ६३·३२ | ७४·९३ |
| बसविलेल्या चात्या | १,०३,५३,९७३ | १,०४,३३,०६५ |
| चालू चात्यां | ९५,८४,२५७ | ९५,८०,२२७ |
| बसाविलेले माग | २,०२,६६२ | २,०२,०७२ |
| चालू माग | १,८४,७९० | १,८५,३६० |
| खपलेला कापूस (७८४ पौंडांच्या खंडी) | १९,८६,०७८ | २१,४१,४८७ |
| कामगारांची संख्या (दिवस पाळी) | ४,८८,३७० | ४,७६,१४५ |

### गिरण्यांची प्रांतवारी विभागणी

| प्रांत | गिरण्यांची संख्या | चात्यांची संख्या (हजार) | मागांची संख्या | कामगार (हजार) |
|---|---|---|---|---|
| मुंबई प्रांत व बेट | ६५ | २८६६ | ६५,८८० | १२३ |
| अहमदाबाद | ७४ | १८४७ | ४२८१६ | ७३ |
| इतर केंद्रें | ७० | १२९४ | २६५०७ | ६८ |
| एकूण | २०९ | ६०९४ | १३५,२०३ | २६७ |
| राजपुताना | १० | १,३४ | ३,०२९ | ८ |
| वऱ्हाड | ४ | ६८ | १४७४ | ४ |
| मध्यप्रांत | ७ | २,९८ | ५,३७८ | १८ |
| बिहार ओरिसा | २ | २६ | ७४५ | १ |
| हैद्राबाद | ६ | १,१८ | २,४६२ | ७ |
| मध्य हिंदुस्थान | १७ | ३,९७ | १०,३२२ | २६ |
| पश्चिम बंगाल | २९ | ३,९० | ८,९०९ | २१ |
| पूर्व पंजाब | ४ | ३८ | ७८० | २ |
| दिल्ली | ६ | १,२१ | ३,३२२ | ६ |
| संयुक्तप्रांत | २८ | ७,७६ | १२,१०२ | ३० |
| मद्रास | ७३ | १६,३० | ७,९७३ | ५९ |
| त्रावणकोर | २ | १८ | ३१० | ०२ |
| म्हैसूर | ८ | १,५६ | २,८७७ | ११ |
| पाँडीचरी | ३ | ८३ | १,९८० | ६ |
| पाकिस्तान | १४ | १,६७ | ४,६०३ | १० |


दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.

हेड ऑफिसः—१११।११२ सदाशिव पेठ, सातारा

शाखाः—औन्ध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.

मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर, कऱ्हाड वगैरे

★ ठिकाणांवर ड्राफ्टस् दिले जातात.

बचतीच्या आकर्षक योजना

★ मुदत ठेवी आकर्षक दरानें १ ते ५ वर्षें पर्यंत स्वीकारल्या जातात.

★ सेव्हिंग बँकेंत रु. १५,०००/– पर्यंत ठेव ठेवतां येते. खात्यांतून आठवड्यांतून दोनदा चेकनें रकमा काढतां येतात. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.


## सारस्वत बँकेची प्रगति

(१९२०—४८)

| वर्ष | सभासद | शेअर भांडवल | रिझर्व्ह व इतर फंड | ठेवी | कर्जे ओव्हरड्राफ्ट येणें | इन्व्हेस्टमेंट |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| १९२० | १९० | ६,००० | ... | १,४०० | ६,८०० | ... |
| १९२५ | ३७८ | १३,१०० | ९०० | १०,६०० | ३२,८०० | ४,२०० |
| १९३० | ४५५ | १७,१०० | ३,८०० | २५,००० | २७,८०० | २१,८०० |
| १९४० | १५२० | ९७,१०० | ५५,७०० | ११,५७,००० | ३,१७,४०० | ८,३१,१०० |
| १९४८ | २६०७ | ४,११,०५० | २,३४,४०० | ८२,२९,७०० | २३,३७,३०० | ५८,२०,००० |

### सारस्वत बँकेची बेळगांव शाखा

सारस्वत को. बँक लि. ची बेळगांव येथील शाखा आज ता. ३० रोजीं वर्षप्रतिपदेला उघडण्यांत येत आहे. बँकेची मुख्य कचेरी मुंबई येथें गिरगावांत असून तिचें दादर येथें सब–ऑफिस आहे. बँकेचें खेळतें भांडवल ९३ लक्ष रुपयांवर गेलेलें आहे. बेळगांव येथील शाखाहि बँकेच्या लौकिकांत व भरभराटींत भर घालील, ह्यांत संशय नाहीं.

### श्री. भट ह्यांच्या निबंधास बक्षीस

"ग्रामपंचायतीची जागा सहकारी संस्था घेऊं शकतील काय ?" ह्या विषयावर अन्योन्य सहाय्यकारी संस्था लि. बडोदें ह्यानें चढाओढीसाठी निबंध मागविले होते. त्यांत श्री. रामकृष्ण दत्तात्रय भट, पुणें सहकारी चर्चा मंडळाचे सेक्रेटरी, ह्यांस एक बक्षीस मिळालें असें समजतें.

### पूना मर्चंट्स बँकेंत पानसुपारी

प्रतिवर्षीप्रमाणें पूना मर्चंटस को. बँक लि. मध्यें बुधवार, ता. ३० रोजीं गुढीपाडव्यानिमित्त श्रीसरस्वती व श्रीलक्ष्मीपूजन असून सायंकाळीं ६ ते ९–३० पानसुपारी समारंभ आहे.

### उद्योगपूर वसाहत मंडळ लि., पुणें

वरील नव्या पब्लिक कंपनीस १०,००,००० रुपयांचें शेअर भांडवल उभारण्यास कंट्रोल ऑफ कॅपिटल इश्यूज योजनेखालीं परवानगी मिळाली आहे.

### श्री. खोले भोर स्टेट बँकेचे डायरेक्टर झाले

भोर स्टेट बँक लि. ची वार्षिक सभा पुणें येथें रविवार, ता. २७ रोजीं भरली होती. तिचेमध्यें श्री. य. द खोले ह्यांची बँकेच्या बोर्डावर डायरेक्टर म्हणून निवडणूक झाली


★ पूना कमर्शिअल हायस्कूल ★

व्यापारी विषय शिकविणारें पुण्यांतील पहिलेंच हायस्कूल. देशी व इंग्रजी पद्धतीचा जमाखर्च, शार्टहँड टाइंपरायटिंग, व्यापारोपयोगी माहिती, पत्रव्यवहार असे उपयुक्त विषय. इं. ३ री व ४ थी पास झालेल्यांस अनुक्रमें ४ थी व ५ वी मध्यें प्रवेश. हुषार व गरीब विद्यार्थ्यांस सवलती. विशेष माहिती समक्ष. नवीन वर्ग १ मार्च पासून सुरू झाले आहेत.

डेक्कन इन्स्टि. ऑफ कॉमर्स बिल्डिंग, ५९४ बुधवार पेठ, जिजामाता बागेचा कोपरा, पुणें २.

कृ. म. रानडे, बी. ए., बी. कॉम. मुख्याध्यापक.

## भाडेकरूंचे पुढील कांहीं प्रश्न

लेखकः—श्री. श्री. वि. गाडगीळ, एम्. ए., एल्एल्. बी.

### पडिक इमारतींतील भाडेकरूंचा प्रश्न

खरोखरच जर इमारती पडिक झाल्या तर त्या पाडावयास पाहिजेत व त्यापासून जीवित–हानि होणार नाहीं याबद्दल दक्षता बाळगावयास पाहिजे याबद्दल कोणाचेंही दुमत होणार नाहीं. त्यासाठी नगरपालिकेच्या कायद्यांत चीफ ऑफिसरास व म्युनिसिपल कमिशनरास अमर्याद अधिकार देऊन ठेवले आहेत. इतक्या दिवस इमारत पाडण्यासंबंधीं घरमालक व नगरपालिकेचे अधिकारी यांचे दरम्यानंच जो कांहीं वाद चालावयाचा तो चालत असे. परंतु हल्लीं तो जमाना बदलला असून या प्रकरणीं भाडेकऱ्यांच्या हितानहिताचा प्रश्नही उपस्थित झाला आहे. हल्लीं या प्रश्नास तिरंगी स्वरूप प्राप्त झालें आहे. जागेच्या अडचणींमुळें भाडेकऱ्यास दुसरीकडे जागा मिळत नाहीं. मालकास जुन्या भाडेकऱ्यांकडून भाडें जास्त मिळत नाहीं. अशा परिस्थितींत कोर्टामधून भाडेकऱ्यास हुसकून लावावें तर अनेक अटी कोर्टाकडून लादल्या जातात. म्हणून घरमालक नगरपालिकेच्या कायद्यांतील पडिक इमारतींच्या कलमाचा फायदा घेण्याच्या दृष्टीनें नगरपालिकेला आपण होऊनच इमारत पडिक झाल्याची माहिती देतात. नगरपालिकेचे अधिकारी जागेची तपासणी करून असा भाग उतरवून घेण्यास ताबडतोब मुख्याधिकाऱ्याच्या सहीनें नोटीस देतात. अशी नोटीस आली कीं, कायद्याप्रमाणें त्यांत ढवळाढवळ करण्याचा दिवाणी कोर्टासही अधिकार राहात नाहीं. अशा परिस्थितींत भाडेकरूंची स्थिति केविलवाणी होते.

भाडेकरी राहात असतात तेवढी जागा तर त्यांना दुसरीकडे मिळणें शक्यच होत नाहीं व भाड्याचा दरही इतरत्र इतका सोईस्कर मिळणें कठीण असतें. हल्लीं पुण्यांत चीफ ऑफिसरांकडून या ज्या नोटिसा येतात त्यांत वास्तविक पडिक भाग उतरवून घेण्याची, दुरुस्ती करण्याची अगर धीरे वगैरे देऊन मजबुती करण्यास सांगण्याची सोय आहे. परंतु या ज्या नोटिसा येतात त्या वरील जागा पाडून टाकण्याच्या येतात. त्यामुळें भाडेकऱ्यास चंबूगबाळें आटोपून दुसरीकडे जाण्यापलिकडे दुसरा कांहीं इलाज उरत नाहीं. या नोटिसांत दुरुस्ती व धीरे वगैरे देण्यास सांगण्याची सोय असतां तशा सूचना कां करण्यांत येत नाहींत यासंबंधीं एका तत्संबंधित अधिकाऱ्यास विचारलें असतां त्यानें अशी सबब सांगितली कीं, नगरपालिकेच्या कोण्या एका कायदेसमितीनें आपला असा अभिप्राय प्रगट केला कीं, एकाच कोणत्यातरी सूचनेची नोटिस कायद्याप्रमाणें देता येईल. म्हणजे एक तर इमला उतरण्यास सांगतां येईल, नाहींतर धीरे देऊन मजबूत करण्यास सांगतां येईल; पण कांहीं भाग पाडून टाकण्यास, दुसरा भाग दुरुस्त करण्यास व तिसरा भाग धीरे देण्यास सांगता येणार नाहीं. हा अभिप्राय सयुक्तिक दिसत नाहीं. अशीं घरें खालीं करून घेतांना गरीब बिचाऱ्या भाडेकऱ्यांची सोय लावण्याची जबाबदारी नगरपालिकेवरही नाहीं व घरमालकांवरही नाहीं. तशी जबाबदारी वास्तविक भाडेंनियंत्रण कायद्यानें घरमालकांवर टाकली आहे. परंतु तिला टाळा या निराळ्या कायद्यानें घरमालकांनीं देण्यास सुरवात केली आहे. अशा प्रकरणीं एकदम पन्नास–पन्नास, शंभर–शंभर माणसांच्या राहण्याचा प्रश्न उत्पन्न होतो व त्याचा उलगडा करणें फार कठीण जाते. नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनीं पडिक इमारतीबाबत नोटिस देतांना घरमालकाचा हा कावा ध्यानांत घेतला पाहिजे व दुरुस्त्या अगर धीरे देऊन कांहीं दिवस इमारती राहण्याजोग्या असतील तर त्या पाडण्याच्या मार्गे लागूं नये अगर शक्य झाल्यास मालकास पुनः इमारत बांधून त्यांत जुन्या भाडेकरूंस ठेवण्यास सांगावें. अगदींच धोक्याच्या झाल्या आहेत असें म्युनिसिपल एंजीनियरास वाटतील तेवढ्याच पाडाव्यात.

### स्टँडर्ड रेंटबाबत गोंधळ

स्टँडर्ड रेंटच्या बाबतींत घरमालकांकडून अन्याय चालला आहे. एक भाडेकरी गेला कीं, दुसऱ्या भाडेकऱ्याकडून जादा भाडें घेण्याचा क्रम घरमालकांनीं सरळ सरळ चालविला आहे व त्यास आळा घालण्याचें काम कोर्टाचें असतां त्यांच्याकडून तें व्हावें तसें होत नाहीं. उलट, कबजा भाड्याच्या दाव्यांत पुष्कळ कोर्टें अगदीं सहज लीलेनें घरमालकास म्हणून जातात कीं, "तुम्हांला जास्त भाडें पाहिजे असेल तर मी बावयास सांगतों." तसेंच स्टँडर्ड रेंट हें जागेगणिक आहे, भाडेकऱ्यागणिक नाहीं ही गोष्टही विसरली जाते. जागा १९४० च्यापूर्वी बांधलेली असली व त्यावेळीं त्या जागेचें भाडें अमुक होतें असें दाखविलें तरीही कोर्टें हें भाडें ठरवितांना हल्लींच्या परिस्थितीकडेच पाहतात व भाड्यांत वाढ भरमसाट स्टँडर्ड रेंटच्या नांवाखाली होते. हल्लींच्या दिवसांत दोन तीन खणाची खोली असली कीं, त्याचें भाडें २५–३० रु. सहज म्हटलें जातें व त्या मानानें पूर्वींच्या वेळीं तीच खोली ५–६ रुपयांस घेतली असेल व त्याचें भाडें वाढवून १५–२० रुपयांपर्यंत गेलें असेल तर कोर्टास त्यांत विशेष असें कांहींच वाटत नाहीं. त्यांना त्याहून कमी भाडें असता त्याविषयीं आलेली तक्रार भांडखोरपणाची वाटते. कोर्टांनीं आपला हा दृष्टिकोन बदलणें जरूर आहे. १९४० च्या आधीच्या जागा असल्या तर त्यांचें भाडें त्याच प्रमाणांत ठरविलें पाहिजे. त्यांना हल्लींच्या परिस्थितीचा निकष लावणें कायद्याच्या विरुद्ध आहे व भाडेकऱ्यांना अन्याय करणारें आहे.

### घरमालकांचा भ्रामक युक्तिवाद

स्टँडर्ड रेंटच्या नांवाखाली भाड्यांत वाढ करतांना पुष्कळदां असा युक्तिवाद करण्यांत येतो कीं, इतर सर्व बाबतींत महागाई वाढली असतां घरमालकांनाच तेवढे निर्बंध कां असावेत? त्यांना महागाई बोंचत नाहीं का? हा युक्तिवाद सकृतदर्शनीं बिनतोड वाटतो. परंतु थोड्याशा विचारांतीं त्यांतील फोलपणा ध्यानांत येण्याजोगा आहे. घरावर खर्च केलेला पैसा हा गुंतवलेला पैसा आहे व त्यावर विशिष्ट प्रमाणांत व्याज मिळालें म्हणजे त्याचें काम झालें. घराच्या रूपानें त्यानें गुंतविलेला पैसा कायमच असतो व असें व्याज १९४० च्या पूर्वींच्या घरांवर केव्हांच दामदुप्पट येऊन गेलेलें असतें. घर खरेदी हा नफेबाजीचा व्यापार नसून पैसे गुंतविण्याचा एक प्रकार आहे व त्यावर व्याजाहून जास्त अपेक्षा करणें हें व्यवहारास धरून केव्हांही होणार नाहीं. अशा परिस्थितींत स्टँडर्ड रेंट ठरवितांना इतर कोणत्याही कल्पना कोर्टानें मनांत आणतां उपयोगी नाहीं. या ठिकाणीं कित्येकजण असेंही म्हणतात कीं, भाडेकऱ्यांना महागाई भत्ता वगैरे मिळत असतां घरभाड्यांतच ही कुचराई कां? त्यावर उत्तर असें कीं घरमालकांनाही नोकरी करून अगर धंदा करून पैसे मिळविण्यास कोणी अडविलें नाहीं. स्टँडर्ड रेंटचे अर्ज हल्लीं दिवाणी कोर्टाकडे करण्याची सोय भाडेंनियंत्रण कायद्यानें केली आहे. परंतु त्याचा विशेषसा इष्ट परिणाम निदान पुण्यांत तरी झालेला दिसत नाहीं. स्टँडर्ड रेंटचे बहुतेक अर्ज हात न लागतांच पडून राहिले आहेत.

## अशिलांच्या वतीनें वकिलांचीं बँकांतील खातीं

### बँकांची जबाबदारी कमी करणारें बिल

वकिलांनीं त्यांच्या अशिलांचे वतीनें बँकांत उघडलेल्या खात्यांचे संबंधांतील मुंबईमधील बँकांवरील जबाबदारी कमी करण्याचे हेतूनें हिंदी पार्लमेंटांत अर्थमंत्र्यांनीं एक बिल मांडलें आहे. मुंबई हायकोर्टाच्या नियमाप्रमाणें, त्या हायकोर्टांत वकिली करणाऱ्या "अटर्नें"ला त्याच्या अशिलाच्या पैशाचें बँकेंत खातें उघडावें लागतें. ह्या खात्यावर अशिलाचें नांव असतें आणि नियमांत नमूद असलेल्या कारणापुरतेंच तें खातें चालवितां येतें. अशिलाच्या वतीनें होणाऱ्या ह्या प्रत्येक व्यवहाराची बँकेला चौकशी करावी लागते. कारण बँकेला ह्या 'ट्रस्ट'चें स्वरूप कळविलेलें असतें. ही जबाबदारी मोठी असून, अशा खात्यांवरील चेक्सच्या देवघेवीसहि अटथळा येतो. ह्या दोन्ही गोष्टी सुधारणें, हा प्रस्तुत बिलाचा उद्देश आहे. मुंबई शहरांत अशा प्रकारचे नियम अंमलांत असल्यानें, तेथेंच तूर्त ह्या नव्या कायद्याची अंमलबजावणी होईल.

### पैशाची तंगी : कर्जावरील व्याजाचे दर वाढले

इंपीरियल बँकेनें गेल्या आठवड्यांत, सरकारी रोख्यांचे तारणावर द्यावयाच्या कर्जावरील व्याजाचा दर तीन टक्के केला. कांहीं महिन्यांपूर्वीपर्यंत तो अडीच टक्के होता, तो तेव्हां पावणे तीन टक्के करण्यांत आला आणि आतां तो तीन टक्के झाला आहे. बाजारांतील पैशाच्या तंगीचा हा परिणाम आहे. कित्येक बँकांनीं इंपीरियल बँकेकडे कर्जाची मागणी केली त्यामुळें व्याजाचा दर वाढविणें तिला अपरिहार्य झालें. पैशाची मागणी पुरी पाडण्यासाठी तिनें ५ कोटींचे सरकारी रोखे विकले तरी तेवढ्यानें भागलें नाहीं. सर्वच बँकांकडे कर्जाची मोठी मागणी आहे आणि ठेवी मात्र वाढत नाहींत. तेव्हां, त्यांचे कर्जावरील व्याजाचे दरहि चढीचे होऊं लागले आहेत. चढत्या व्याजाची ही प्रवृत्ति अशीच टिकून राहिली तर सरकारला पूर्वीप्रमाणें स्वस्त दरानें पैशाचा पुरवठा होणें कठीण जाणार हें उघड आहे. सोनें व चांदी ह्यांच्या किंमतींत ह्याच सुमारास घट झाली आहे, त्याचेंहि एक कारण पैसा उभा करण्याची तातडी हेंच असलें पाहिजे.

### दि साठे बिस्किट अँड चोकोलेट कंपनी लि., पुणें

वरील कंपनी ता. १० फेब्रुवारी रोजीं नोंदण्यांत आली असून तिनें आपला प्रॉस्पेक्टस प्रसिद्ध केला आहे. बिस्किटें, ब्रेड, कोको, चोकोलेट, वगैरेंच्या उत्पादनाचा व व्यापाराचा धंदा कंपनी करणार आहे. त्यासाठी कंपनी साठे बिस्किट कं. व साठे चोकोलेट वर्क्स विकत घेणार आहे. त्या दोन्ही कारखान्यांची खरेदीची किंमत ५,१२,००० रु. आहे. त्यांपैकी १,१०,००० रु. रोख देण्यांत येतील व बाकीच्या रकमेचे ऑर्डिनरी शेअर्स दिले जातील. मेसर्स साठे फूड इंडस्ट्रीज लि.ला मॅनेजिंग एजंट नेमण्यांत आलें आहे. श्री. ग. वि. पुराणिक, पनवेल, हे डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन असून श्री. डी. एस. भावे, श्री. पी. बी. गणपुले, रा. ब. जी. जी. शेंबेकर, श्री. के. जी. कार्णिक, श्री. जी. आर. साठे व श्री. डी. आर. साठे हे डायरेक्टर आहेत.

## हिंद सरकारच्या फडणिशी खात्याचा कारभार

प्राप्तीवरील कराची आकारणी आणि वसुली ह्यासंबंधीं हिंद सरकारनें जी मोहीम स्वीकारली होती त्याचा परिणाम होऊन गेल्या ९ महिन्यांत मध्यवर्ती सरकारच्या तिजोरींत १५ कोटी रुपयांची आवक झाली. ह्या अवधींत कर आकारणीसंबंधींचीं १,९७,००० प्रकरणें निकालीं काढण्यांत आलीं. हिंद सरकारनें आपल्या फडणिशी खात्याच्या कामासंबंधीं काढलेल्या माहितीपत्रकांत इतरही अनेक गोष्टींसंबंधीं निवेदन करण्यांत आलेलें आहे. इंग्लंडच्या सरकारनें हिंदुस्थानांत संरक्षण विषयक साहित्य तसेंच ठेवलें आहे, त्याचा मोबदला म्हणून हिंद सरकारनें १० कोटी पौंड देण्याचें ठरलें आहे. ह्या रकमेपैकी ४½ कोटी पौंड गेल्या ऑगस्टमध्यें देण्यांत आले. उरलेली रकम चालू महिनाअखेर द्यावयाची आहे. संरक्षणविषयक साहित्य आणि तळावरील यंत्रसामुग्री ह्यांच्यापैकीं जो भाग पाकिस्तानांत असेल त्याच्याबद्दल पाकिस्ताननें हिंदुस्थानला पौंडांत किंमत देण्याचें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें पाकिस्तानकडे १६·९९ कोटी रुपयांची मागणी करण्यांत आली. परंतु फाळणीच्या दिवशीं पाकिस्तानांत संरक्षणविषयक जें साहित्य होतें त्याची किंमत म्हणून पाकिस्तानकडून २·४५ कोटी रुपये एवढीच रकम आतांपर्यंत आलेली आहे. हिंद सरकारच्या इंडस्ट्रियल फिनॅन्स कॉर्पोरेशननें आतांपर्यंत १·८४ कोटी रुपयांचीं कर्जें औद्योगिक कंपन्यांना दिलीं आहेत. ह्या उद्योगधंद्यांत यंत्रांचे कारखाने, कांचेचे कारखाने, लोखंड व पोलादाचे कारखाने, वीज उत्पन्न करणारे कारखाने, इत्यादि प्रकारचे कारखाने आहेत.

### शेती आणि अन्नधान्य : कांहीं माहिती

(१) मध्यवर्ती सरकारच्या शेतकी खात्याकडून पुरविण्यांत आलेल्या यांत्रिक नांगरांच्या साह्यानें देशांतील पडीक जमिनीपैकीं रोजीं ६२५ एकर जमीन नव्यानें नांगरली जात आहे.

(२) हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या दर २८,००० टन गव्हामागें हिंदुस्थान १ कोटी रुपयांच्या किंमतीची परदेशीय हुंडणावळ वांचवूं शकतो.

(३) हिंदुस्थानांतील लागवडीखालीं असलेल्या जमिनीपैकीं ८३ टक्के जमीन अन्नधान्याच्या लागवडीखालीं आहे. त्यांपैकी ३१·६ टक्के जमीन भाताखालीं, २९ टक्के जोंधळा व इतर धान्याखालीं आणि १४·७ टक्के गव्हाखालीं आहे.

(४) १९४८ सालीं मध्यवर्ती सरकारच्या अन्नखात्यानें देशांतील सर्व तुटीच्या विभागांना मिळून ३२ लाख टन अन्नधान्य वाटलें.

(५) फाळणी झाल्यानंतर हिंदुस्थानला आपल्या मूळच्या लोकसंख्येपैकी ७८ टक्के लोकसंख्येला, मूळच्या भाताखालील जमिनीपैकी ७१·७ टक्के जमिनीवर आणि मूळच्या गव्हाखालील जमिनीपैकीं ७१ टक्के जमिनीवर पोसावें लागत आहे.

**कॅनडांत प्राप्तीवरील करांत कपात**— कॅनडाच्या सरकारनें प्राप्तीवरील करांत कपात करण्याचें ठरविलें असून त्यामुळें सरकारच्या ह्या कराच्या उत्पन्नांत २७ कोटी डॉलर्स घट होणार आहे. ह्या कपातीची अंमलबजावणी ता. १ जानेवारी १९४९ पासून करण्यांत येणार आहे. नवीन धोरणामुळें ७॥ लाख कॅनेडिअन नागरिकांना प्राप्तीवरील कर भरावा लागणार नाहीं; इतकेंच नव्हे तर जानेवारी १९४९ पासून त्यांनीं भरलेला करही परत मिळणार आहे. उरलेल्यापैकीं ⅔ नागरिकांना कर-पात्र उत्पन्नावर सरासरी फक्त १५ टक्के कर द्यावा लागेल.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा प. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. आ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.